चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२० जून, २०१७
☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# ❖ अवैद्य दारूवर अधिक प्रभावी कार्यवाही करीता जिल्हयातंर्गत विशेष दारूबंदी पथक गठीत.

चंद्रपुर जिल्हा दारूबंदी होउन दोन वर्ष पुर्णत्वास आले. या दरम्यान कोटीच्या वर दारू जप्त करण्यात आली असुन कित्येक आरोपीतांना गजाआड करण्यात आले. यामध्ये शेकडोच्या घरात चार चाकी तसेच दुचाकी सुध्दा जप्त करण्यात आल्या. दारूबंदीच्या या मोहिमेस अधीक प्रभावी करण्यात करीता पोलीस दलाने वेळोवेळी सामान्य नागरीकांचाही सहभाग या मोहिमे मध्ये करून घेतला. तरी देखील काही समाज कंटक हे या कार्यवाहीस नजुमानता लपुन दारू विक्री करीतच आहेत. यावर प्रभावी आळा घालण्या करीता म्हणुन पोलीस विभागाने थेट अपर पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनात विशेष दारूबंदी पथक स्थापन केले आहे.

जिल्हयाचे अपर पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनात कार्य करणा—या या विशेष दारू बंदी पथकामध्ये एक पोलीस निरीक्षक, एक साहायक पोलीस निरीक्षक व दहा पोलीस कर्मचारी यांचा समावेश आहे. संपुर्ण जिल्हयातंर्गत कुठेही दारू बाबत तक्रार अथवा काही गोपनिय माहिती असल्यास नागरिक त्याबात थेट तक्रार या पथकाकडे करू शकणार आहेत त्याकरीता म्हणुन पोलीस दलातर्फे ९११२२५५७२७ हा क्रमांक नागरीकांकरीता प्रसारीत करण्यात आला आहे. या क्रंमाकावर फोनव्दारे, मॅसेज किंवा व्हॉट्स ॲप व्दारे नागरिकांनी तक्रार किंवा दारू संबंधी माहिती देण्याचे आवाहन पोलीस दला कडुन करण्यात येत आहे.

---

चंद्रपूर पोलीस